# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**सोमवार, दिनांक २४ जून, २०१९ / आषाढ ३, १९४१ ( शके )**

**(१) उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, संसदीय कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**
**(२) पर्यावरण मंत्री**
**(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**(४) अन्न व औषध प्रशासन मंत्री**
**(५) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री**
**(६) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४४**

---

### नागपूर शहराच्या सीमेलगतच्या भागातील गावांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत

**(१) * १३५४७४ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहराच्या सीमेलगत असलेल्या चिंचभुवन, मनिषनगर, दाभा, वाठोडा, बेलतरोडी व नरसाळा येथील तसेच ग्रामिण भागातील अनेक ठिकाणी पाणी दुषीत असून विहीरी व बोअरवेलच्या पाण्यामध्ये मोठ्या प्रमाणात क्षार असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल, २०१९ मध्ये जलस्रोतातील पाण्याच्या नमुन्यांची रासायनिक तपासणी प्रादेशीक आरोग्य प्रयोगशाळेत करण्यात आली असता १८ टक्के नमुने दुषीत असल्याचे तसेच जिल्हयातील १७ जलस्रोतामध्ये क्लोरीनची मात्रा २० टक्यांपेक्षा कमी आढळून आल्याने गांवामध्ये आजार पसरण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या पाणी पुरवठा विभागाने या वस्त्यांमध्ये पाणी पुरवठा करण्याकरीता महानगरपालिका, नागपूर यांना योजना तयार करण्याकरीता निर्देशीत केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) प्रश्नामध्ये नमूद केलेली चिंचभुवन, मनिषनगर, दाभा, वाठोडा, नरसाळा ही गावे महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ठ आहेत तर बेलतरोडी हे गाव नागपूर जिल्हयातील ग्रामीण भागातील आहे.

चिंचभुवन, मनिषनगर, दाभा व नरसाळा येथील अनुक्रमे ४, १, ५ व ३ नमुन्यांची अनुजैविक तपासणी केली असता, सर्व नमुने अयोग्य असल्याचे आढळून आले. तसेच उपरोक्त ठिकाणाच्या सर्व नमुन्यांची रासायनिक तपासणी केली असता बहुतांश नमुने अयोग्य असल्याचे आढळून आले. वाटोढा गावातील कोणत्याही पाणी नमुन्यांची तपासणी करण्यात आलेली नाही. नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये अयोग्य पाणी नमुने आढळून आलेल्या विहीरीचे पाणी न वापरण्याबाबत नागरिकांना अवगत करण्यात आले आहे. नागपूर शहरामध्ये जलवाहिन्या असलेल्या भागामध्ये नळाद्वारे दररोज शुद्ध पाणीपुरवठा केला जातो व जलवाहिन्या नसलेल्या भागामध्ये टँकरद्वारे महानगरपालिकेकडून पाणी पुरवठा केला जातो.

तसेच ग्रामीण भागातील बेलतरोडी येथील १० नमुन्यांची रासायनिक तपासणी केली असता, सर्व नमुने योग्य असल्याचे आढळून आले व ५४ नमुन्यांची अनुजैविक तपासणी केली असता, ४८ नमुने योग्य व ६ नमुने अयोग्य असल्याचे आढळून आले. नागपूर जिल्हयातील ग्रामीण भागातील माहे ऑक्टोबर २०१८ ते मार्च २०१९ या कालावधीत १०१०३ पाणी नमुन्यांची रासायनिक तपासणी केली असता ५८७८ नमुने अयोग्य असल्याचे आढळून आले. तसेच सन २०१८-१९ या वर्षामध्ये १४७२२ पाणी नमुन्यांची अनुजैविक तपासणी केली असता १३४३ नमुने अयोग्य असल्याचे आढळून आले. सदर स्त्रोतांचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याबाबतचे फलक स्त्रोताजवळ लावण्यात आले असून, संबधित गावांस सुरक्षित स्त्रोतामधून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

तसेच ३२७ ब्लिचिंग पावडर नमुन्यांची तपासणी केली असता, त्यापैकी १५ नमुन्यामध्ये क्लोरीनची मात्रा २० टक्क्यापेक्षा कमी आढळून आली. ज्या ग्रामपंचायती किंवा गावांमध्ये २० टक्क्यापेक्षा कमी क्लोरिन असल्याचे आढळून आले, त्या गावांना ३३ टक्के क्लोरिन मात्रा असलेले ब्लिचिंग पावडर वापरण्याबाबत कळविण्यात आले असून, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) नागपूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात अनधिकृत/अधिकृत/झोपडपट्टी (स्लम) अभिन्यासामध्ये पाणीपुरवठा प्रणालीचे विस्तारीकरण, उन्नतीकरण व बळकटीकरण करण्याकरिता केंद्र शासन व राज्य शासन पुरस्कृत अमृत योजनेच्या कामास सुरूवात झाली असून या योजनेमध्ये चिंचभुवन, मनिषनगर, दाभा व वाठोडा हा भाग समाविष्ट आहे. तसेच महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येत असलेल्या हुडकेश्वर नरसाळा पाणी पुरवठा योजनेमध्ये नरसाळा भागाचा समावेश आहे. शहराच्या जलवाहिन्यांचे जाळे नसलेल्या सिमावर्ती भागात पाणी पुरवठा करण्याकरिता मुख्य जलवाहिन्या व वितरण जलवाहिन्या टाकण्याचे काम अमृत योजनेमध्ये अंतर्भूत असून, सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोणावळा (जि.पुणे) येथील मगनलाल फूड प्रोडक्टस् या चिकीचे उत्पादन निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(२) * १३५६२७ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणावळा (जि.पुणे) येथील मगनलाल फूड प्रोडक्टस् या कंपनीच्या चिक्कीचे उत्पादन निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनास आले असून अन्न व सुरक्षा कायद्याचा भंग होत असल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ११ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास उत्पादकांना नोटीस दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार निकृष्ट दर्जाच्या चिक्कीचे उत्पादन व विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने चौकशी केली असून सदर आस्थापनेस अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६, नियम व नियमन २०११ मधील विविध तरतुदीचे उल्लंघन केल्याने एकूण रुपये ५ लाख इतका दंड ठोठावण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातील कमवा आणि शिका योजनेत झालेली अनियमितता

**(३) * १४१०९४ श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठात विद्यार्थ्यांनी काही तास काम केल्यानंतर त्यांच्या बँक खात्यात मानधन जमा केले जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठात काही वर्षापासून बोगस विद्यार्थी दाखवून मानधनाची रक्कम घेण्याचे प्रकार सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कमवा आणि शिका या योजनेमधील आर्थिक अनियमिततेची चौकशी करण्यासाठी विद्यापीठाने माजी कुलगुरू डॉ.अरुण अडसूळ यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या चौकशीमध्ये या योजनेंतर्गत अनेक बोगस विद्यार्थ्यांच्या नावे बँकेत रक्कम जमा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) कमवा आणि शिका योजना मधील आर्थिक अनियमिततेची चौकशी करण्यासाठी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाने माजी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीमार्फत चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत करण्यात आलेल्या भरतीबाबत

**(४) * १३८२२२ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत करण्यात आलेल्या भरती प्रक्रियेतील ५ टक्के स्पार्टस् कोट्यामधील राखीव जागांवर बनावट खेळाडू प्रमाणपत्र धारकांची निवड करण्यात आल्याबाबतची दिनांक १ जुलै, २०१६ व १० ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा यांच्यामार्फत सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीतील निष्कर्षानुसार किती बोगस प्रमाणपत्र धारक उमेदवार असल्याचे निदर्शनास आले आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व व त्यानुसार बोगस प्रमाणपत्राची पडताळणी न करता त्यांना सेवेत सामावून घेणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे व उपरोक्तबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) होय.

(२) व (३) ५ टक्के खेळाडू आरक्षणातील राखीव जागांवर बनावट खेळाडूंची निवड झाल्याबाबत, खेळाडूंनी तक्रारी दाखल केल्या होत्या. सदर तक्रारीमध्ये नमूद बोगस खेळाडूंच्या प्रकरणी संबंधित उपसंचालक यांच्याकडून पात्र स्पर्धांच्या अभिलेखांची शहानिशा केली असता सदर तक्रारीमध्ये तथ्य नसल्याचे आढळून आले आहे. तथापि, बोगस प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्याबाबतचे सबळ पुरावे आढळून आल्यास, प्रकरणाची शहानिशा करुन संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात खोबरेल, शेंगदाणा व तीळाच्या तेलामध्ये पामतेलाची भेसळ होत असल्याबाबत

**(५) * १३६९३५ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खोबरेल, शेंगदाणा व तीळ इत्यादी तेलाची बाजारात किंमत २०० ते ३०० रुपये असून दुकानदार आपल्या नफ्यासाठी ४०० रुपयाच्या तेलामध्ये २० टक्के पामतेलाची भेसळ करुन ते ग्राहकांना विकत असल्याने भेसळ केलेल्या तेलाचा नफा दुकानदाराला होत असल्याचे दिनांक १५ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुट्टया तेलामध्ये किंमत, पॅकिग आणि दर्जावर नियंत्रण नसते तसेच सीजीएसआयने केलेल्या सुट्टया खाद्यतेलाच्या तपासणीनुसार ६० टक्के खादयतेलामध्ये भेसळ आढळून आली असल्याने ग्राहकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सुटट्या तेलाच्या पॅकिंग व दर्जावर अन्न व औषध प्रशासनाचे नियंत्रण आहे. तथापि, किंमती नियंत्रित करण्याची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या अखत्यारीत येत नाही. तसेच सीजीएसआयने केलेल्या सुट्टया खाद्यतेलाच्या तपासणी नुसार ६० टक्के खाद्यतेलामध्ये भेसळ आढळून आली ही बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुष्काळी भागातील शालेय विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करणेबाबत

**(६) * १४०४५७ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भीषण दुष्काळ परिस्थिती असल्याने शालेय विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच, ज्या भागात दुष्काळ जाहीर केला आहे तेथील १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना शासनाकडून शुल्क माफी दिली असल्याने शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक यांनी संबंधित सोलापूर जिल्हा येथील शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे लेखी प्रस्तावाची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सोलापूर जिल्ह्यातील १ हजार २९ माध्यमिक शाळांपैकी शिक्षण विभागाकडे केवळ ५०५ प्रस्ताव तसेच, पंढरपूर तालुक्यातील ७५ शाळा व मंगळवेढा तालुक्यातील ३३ शाळांचे प्रस्ताव आले आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाच्या आदेशाप्रमाणे सरसकट सर्व शाळेतील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्याचे नियोजन असतांना केवळ अर्ध्याच शाळांचे परिक्षा शुल्क माफ करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार ज्या शाळांचे फी शुल्क माफीचे प्रस्ताव आले नाहीत, त्या शाळांकडे पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) शुल्क प्रतिपूर्तीसाठी सोलापूर जिल्ह्यातील पात्र असलेल्या ९७२ माध्यमिक शाळांपैकी ५१८ शाळांचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्य.) सोलापूर यांचेकडे प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये पंढरपूर तालुक्यातील ७७ व मंगळवेढा तालुक्यातील ३४ शाळांचा समावेश आहे.

(४) महसूल व वन विभागाच्या दि. ३१ ऑक्टोबर, २०१८ व दि. ६ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयानुसार दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केलेल्या तालुके व महसुली मंडळातील उर्वरित शाळांकडून प्रस्ताव प्राप्त करुन त्यावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रस्ताव सादर करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी शाळामधील शिक्षकांना शिक्षक पात्रता परिक्षा (टीईटी) अनिवार्य केल्याबाबत

**(७) * १३५१५४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी शाळांमध्ये दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ नंतर नियुक्त झालेल्या पहिली ते आठवीतील शिक्षकांना शिक्षक पात्रता परिक्षा (टीईटी) अनिवार्य केली असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, दिनांक १३ डिसेंबर, २०१३ नंतर नियुक्त झालेल्या प्राथमिक शिक्षकांना शिक्षक पात्रता परिक्षा उत्त्तीर्ण होण्यासाठी शासनाने तीन संधी दिल्या आहेत तर केंद्र शासनाने २०१५ मध्ये चार वर्षे मुदतवाढ दिली असल्याने शासनाने दिलेल्या तीन संधी व ही मुदतवाढ केंद्र शासनाच्या धोरणाशी विसंगत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई वगळता इतर कोणत्याही शाळांमधील टीईटी प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील काही शिक्षकांनी बनावट टीईटी प्रमाणपत्र सादर करुन नोक-या मिळविल्याच्या तक्रारी महाराष्ट्र राज्य परिषदेकडे आल्या असल्याने उक्त शिक्षकांना शिक्षक पात्रता परिक्षा (टीईटी) उत्तीर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र शिक्षण परिषदेकडे दिनांक ३० मार्च, २०१९ पर्यंत सादर करण्याचे आदेश दिले असून प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची सेवा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, सन २०१३, २०१४ २०१५, २०१७, २०१८ या वर्षी घेण्यात आलेल्या टीईटी परिक्षामध्ये एकूण ६९ हजार ७०६ उमेदवार उत्तीर्ण झाले असून, राज्यातील जे प्राथमिक शिक्षक टीईटी उत्तीर्ण नाहीत त्यांचे वेतन देयक केवळ दिनांक ३० मार्च, २०१९ पर्यंत द्यावे असा आदेश वेतन अधीक्षक कार्यालयाने दिल्याचे निदर्शनास आले असून यामुळे अनेक शिक्षकांची नोकरी धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे.

(५) अंशत: खरे आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव (ता.कोरेगांव, जि.सातारा) येथील नळ पाणीपुरवठा योजनेच्या लोकवर्गणीच्या रक्कमेचा झालेला अपहार

**(८) * १४०१४६ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव (ता.कोरेगांव, जि.सातारा) ग्रामपंचायत येथे राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत नळपाणीपुरवठा योजना मंजूर झाली असून त्यासाठी लोकवर्गणीची ४ लाख २९ हजार रुपये इतकी रक्कम बँकेत भरण्यासाठी ग्रामपंचायतीने अध्यक्ष व सचिव ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती मौजे जळगांव यांचेकडे जमा केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रक्कम अध्यक्ष व सचिव ग्रामीण पाणीपूरवठा व स्वच्छता समिती यांनी जिल्हा परिषद सातारा यांच्याकडे जमा न करता या रक्कमेचा अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार संबंधीतांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) लोकवर्गणीपोटी जमा झालेली रक्कम रुपये ४,२९,५००/- इतकी बँकखात्यात जमा करण्यात आली होती. अध्यक्ष सचिव, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जळगाव यांनी खात्यावरील जमा रकमेपैकी रुपये २,००,०००/- दिनांक २४/०८/२०१६ रोजी व रुपये २,५०,०००/- दिनांक २७/०९/२०१६ रोजी काढल्याचे लेखाविषयक तपासणीत निदर्शनास आले.

(३) लोकवर्गणीपोटी जमा झालेली रक्कम ग्राम पाणी पुरवठा समितीने नियमबाहय काढली असल्याने,सदर रक्कम जमा करण्याबाबत पंचायत समिती, कोरेगाव यांनी दिनांक १७/०५/२०१९ रोजी ग्रामपंचायत, जळगाव यांना कळविले आहे.

(४) हया प्रकरणी उशीर झालेला असून, संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

-----------------

## सटाणा (जि.नाशिक) तालुक्यातील अलियाबाद येथे लाखो रुपयांचा गुटखा जप्त केल्याबाबत

**(९) * १४११९२ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सटाणा (जि.नाशिक) तालुक्यातील अलियाबाद गावाजवळ गुजरात राज्यातून सटाणा मार्गे येणारा साडेचार लाख रुपये किंमतीचा गुटखा जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरात गुटखा विक्रिस बंदी असतांना देखील गुजरातमधून राज्यात अवैधरित्या गुटख्याची मोठ्या प्रमाणावर आयात सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधीत दोषींवर कारवाई करुन गुटखा वाहतूकीस प्रतिबंध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

(२) तथापि, सदर प्रकरणी रु.४,३२,०००/ किंमतीचा पानमसाला व सुगंधित तंबाखु जप्त करण्यात आला आहे. राज्यात गुटखा विक्रीस प्रतिबंध आहे. परंतु, परराज्यातून चोरट्या व छुप्या मार्गाने वाहनांमध्ये लपवून प्रतिबंधित अन्न पदार्थाची वाहतुक करण्यात येते. मात्र सदर बाब अन्न व औषध प्रशासन तसेच पोलिसांच्या निदर्शनास येताच सदर वाहन तसेच प्रतिबंधित अन्न पदार्थ जप्त करुन पुढील कारवाई केली जाते.

(३) अन्न व औषध प्रशासनामार्फतचोरट्या व्यापारास आळा बसावा यासाठी विभागात ज्या ठिकाणी प्रतिबंधित अन्नपदार्थ आढळला ती जागा अथवा वाहन जप्त केले जाते. तसेच प्रतिबंधित अन्नपदार्थ बाळगणाऱ्या व्यक्तिविरुध्द भा.द.वि. कलम ३२८ चा अवलंब करण्यात येतो.

अन्न व औषध प्रशासनामार्फत प्रतिबंधित अन्नपदार्थ बाबत वेळोवेळी विशेष मोहिमा राबवून जप्ती / धाडीची कारवाई केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरुडदेव वाणी पिंपळगांव (ता.पालम, जि.परभणी) येथील श्री.गुरुनंदीकेश्वर शिवाचार्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांनी केलेला अपहार

**(१०) * १३८८३९ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.गुरुनंदीकेश्वर शिवाचार्य शिक्षण संस्था मुरुडदेव वाणी पिंपळगाव (ता.पालम, जि.परभणी) या संस्थेचे अध्यक्ष श्री. गुरुनंदीकेश्वर महाराज यांनी याच संस्थेच्या संचलित श्री.गुरुनंदीकेश्वर शिवाचार्य विद्यालय, पूर्णा या विद्यालयात श्री. विद्यानंद शिवय्या स्वामी हे दुसरे नाव धारण करून कोणतीही शैक्षणिक पात्रता नसतांना मुख्याध्यापक होवून शासनाची दिशाभूल करून कोटयवधी रुपयांचा अपहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी श्री.गिरीश विठ्ठलराव कदम यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे अनुक्रमे दिनांक १७ फेब्रुवारी, २०१८ व २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास तसेच विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडेही तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, परभणी यांना संबंधितांवर उचित कार्यवाही करण्याचे आदेश जा.क्र. २०१८/साप/कक्ष-१/पोल-१/कावी-१५१६ दिनांक २५ एप्रिल, २०१८ या पत्रानुसार दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित मुख्याध्यापक व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी समिती गठीत करण्यात आली असून चौकशी समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयासह राज्यातील शाळांमध्ये शालेय पोषण आहारात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(११) * १३७३१७ डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय पोषण आहार योजनेकरिता शिक्षण विभागाने राज्यातील ३३ जिल्हयातील ८२ हजार ६३६ शाळांसाठी सन २०१८ मध्ये काढलेल्या निविदांमध्ये शासन, प्रशासन आणि ठेकेदार यांनी कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासन आणि ठेकेदार यांनी १७० कोटी रुपयांच्या या योजनेसाठी ३५० कोटी रुपयांची देयके काढली त्यामुळे ही योजना अपयशी ठरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्याच्या शालेय पोषण आहार योजनेत नियुक्त केलेल्या ठेकेदाराने बाजारामध्ये उपलब्ध डाळीच्या किंमतीपेक्षा दुप्पट दर देऊन दीडशे कोटींचा गैरव्यवहार केल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पोषण आहाराचा पुरवठा न करता परस्पर मुख्याध्यापकांच्या बनावट स्वाक्षऱ्या आणि शाळेचे बनावट शिक्के मारून तयार केलेल्या पावत्यांच्या आधारे संबंधित अधिका-यांनी ठेकेदाराला बनावट देयके अदा करुन अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, गिरणा प्राथमिक शाळा दाभाडी (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथे शालेय पोषण आहारात १,२२,००० रुपयांचा अपहार झाल्याचा अहवाल चौकशी

अधिकारी तथा अधीक्षक, गट ब, शालेय पोषण आहार योजना पंचायत समिती, मालेगाव यांनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास शिक्षण अधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद नाशिक यांच्याकडे दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) हे खरे आहे.

(६) सदर प्रकरणी दोषी विरुध्द महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

-----------------

## मुंबई विद्यापीठाचे सन २०१३-२०१४ पासूनचे लेखापरिक्षण झाले नसल्याबाबत

**(१२) * १३४८९८ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाचे सन २०१३-२०१४ पासूनचे लेखापरिक्षण झाले नसल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाने महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार सन २०१३-२०१४ पासूनचा जमाखर्चही अधिसभेसमोर मंजूर करून घेतलेला नसल्याने आयकर विभागाने ५० कोटी रुपयांची नोटीस दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

लेखे तयार नसल्याने अधिसभेकडून मंजूर झालेले नाहीत.

तथापि, लेखे सादर न केल्यामुळे आयकर विभागाची नोटीस प्राप्त झाली नसुन सन २००६-०७ ते २०१२-१३ या वर्षाकरीता विद्यापीठाचे व्यवहार विचारात घेउुन आयकर विभागाने कर निर्धारणानुसार रु.४७.५९ कोटीची नोटीस दिली आहे.
(३) सदर लेखे पूर्ण करण्यासाठी विद्यापीठाने सांविधानिक लेखापालाची नियुक्ती करण्यात आली असुन लेखे संकलन, अंतर्गत लेखापरिक्षण व सांविधानिक लेखापरिक्षण समांतरपणे सुरु असुन यथाशीघ्र पुर्ण करुन घेण्यात येत आहे.याबाबत शासनस्तरावरुन सतत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पातूर (ता.बाळापूर, जि.अकोला) येथील केंद्रीय वखार महामंडळाच्या गोदामातील भिजलेला गहू लाभार्थ्यांच्या देण्यात आल्याबाबत

**(१३) * १३४८८९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पातूर (ता.बाळापूर, जि.अकोला) येथील केंद्रीय वखार महामंडळाच्या गोदामातील भिजलेला प्रमाणापेक्षाही अधिक आर्द्रता असलेला निकृष्ट गहू

गरीब लाभार्थ्यांना देण्यात आला असल्याचे दिनांक ३ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची माहिती गोदाम व्यवस्थापकांनी एफसीआय भोपाळ, प्रादेशिक कार्यालय, नागपूर व केंद्रीय वखार महामंडळाच्या मुंबई येथील वरिष्ठांना दिनांक १५ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरिष्ठ गोदाम व्यवस्थापकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी न झाल्याने निकृष्ट दर्जाच्या गव्हाची माहिती पुढे आली नाही तरीही एफसीआय व्यवस्थापकांनी गव्हाची उचल करण्याचे पत्र जिल्हाधिकारी, अकोला यांना दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार याप्रकरणी संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३), (४) व (५) पातूर व बाळापूर येथील गोदामात प्राप्त गव्हाचे नमुने कनिष्ठ वैज्ञानिक, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अमरावती यांच्याकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांच्या अहवालानुसार बाळापूर येथील गहू योग्य असल्याने सदर गव्हाचे वाटप करण्यात आले आहे. तसेच, पातूर येथे प्राप्त झालेला १ पोते गहू अत्यंत निकृष्ट दर्जाचा असल्याने केंद्रीय वखार महामंडळ, अकोला यांच्याकडे परत करण्याबाबत गोदामपाल, पातूर यांना निर्देश देण्यात आले.

जिल्हाधिकारी, अकोला यांची व्यवस्थापक, केंद्रीय वखार महामंडळ, अकोला यांच्याबरोबर दिनांक ५ एप्रिल, २०१९ रोजी बैठक झाली. त्या बैठकीच्या अनुषंगाने गोदामातून प्रत्येक गोणीची संयुक्त तपासणी करण्यात येऊन, FAQ दर्जाचा गहू पुरवठा करण्यात येईल असे व्यवस्थापक, केंद्रीय वखार महामंडळ, अकोला यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाने पदांची बिंदुनामावली प्रमाणीत केली नसल्याबाबत

**(१४) * १३६१०५ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने गत वीस वर्ष शासनमान्य पदांची बिंदुनामावली प्रमाणित केली नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिंदुनामावली न करणे तसेच शासनाच्या आवश्यक त्या मान्यता न घेता पदभरती करणे या कारणांमुळे शासनाने विद्यापीठाची साडेतीनशे कोटी रुपयांची रक्कम थकवली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशंत: खरे आहे.

विद्यापीठाने सन २०११ पर्यंत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बिंदुनामावली प्रमाणित करून घेतलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

विद्यापीठाने सन २०११ पर्यंत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बिंदुनामावली सहायक आयुक्त (मावक) कोकण भवन व सामान्य प्रशासन विभागाकडून प्रमाणित करून वेळोवेळी नियमानुसार भरतीप्रकिया राबविलेली आहे. विद्यापीठाने अनुदानित पदावरील कर्मचाऱ्यांच्या बदल्या विनाअनुदानित पदावर केल्यामुळे त्यांच्या सेवाविषयक बाबीत अनियमिता झाली. सदर अनियमिता दुरुस्त करेपर्यंत शासनाने सन-२०१३ पासून विद्यापीठाच्या वेतन अनुदानामध्ये २५ टक्के कपात केलेली आहे. अद्यापपर्यंत सदरच्या अनियमितता दुरूस्त झालेल्या नाहीत.

(३) प्रकरणी शासनस्तरावरून कार्यबल गटाची स्थापना करण्यात आली. सदर कार्यबल गटाने त्यांचा अहवाल शासनास सादर केला असून त्यात दर्शविण्यात आलेल्या अनियमितता दूर करण्याची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धारावी, मुंबई येथील क्रीडासंकुल सांताक्रुझ येथील आस्कॉर्प कन्स्ट्रक्शन प्रा.लि. कंपनीला चालविण्यास दिल्याबाबत

**(१५) * १३८६३३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी, मुंबई येथील २५० कोटी रुपयाच्या भूखंडावर २१ कोटी रुपये खर्च करुन उभारण्यात आलेले धारावी क्रीडासंकुल सांताक्रुझ येथील आस्कॉर्प कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीला क्रीडा क्षेत्राचा कोणताही अनभुव नसताना चालविण्यास देण्याचा निर्णय दिनांक ३ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त भूखंड विकासकाला क्रीडासंकुल चालविण्याचा अनुभव नसतानाही देण्याचा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, दिनांक ३० ऑगस्ट, २०१४ ला प्रसिध्द केलेल्या निविदेत दोन ठेकेदारांनी निविदा भरल्याने नियमानुसार निविदा रद्द करणे आवश्यक असतानाही, निविदा रद्द न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) होय, हे खरे आहे. स्वारस्य अभिव्यक्ती सूचना (EOI) मधील अटी व शर्तीनुसार मे.ऑस्कॉर्प कन्स्ट्रक्शन प्रा.लि.कंपनीला चालविण्यास देण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) शासनाच्य दिनांक २७.०२.२०१५ च्या पत्रानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे अभिप्राय घेऊन अध्यक्ष, जिल्हा

क्रीडा संकुल कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील समितीने निविदाधारकाची निवड केलेली आहे. निविदाधारकाकडून अनामत रक्कम घेण्यात आली. प्रशासकीय कारणास्तव अंतिम निर्णय घेण्यास विलंब झाला आहे.

-----------------

## डोलवली (ता.खालापूर, जि.रायगड) येथील दुषित पाणी नदीपात्रात सोडणाऱ्या झोराबियन चिक्स प्रा.लि. कारखान्यावर कारवाई करण्याबाबत

**(१६) * १३८५१६ श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोलवली (ता.खालापूर, जि.रायगड) येथील झोराबियन चिक्स प्रा.लि. या कारखान्यातून मागील अनेक वर्षापासून दुषित पाणी नदीपात्रात सोडत असल्यामुळे उग्रवास पसरुन स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून परिसरातील तीन गावांना पाणीपुरवठा करणा-या योजनेचे पाणी दुषित होत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची पाहणी वा चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने नदीपात्रात दुषित पाणी सोडणाऱ्या कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्याबाबत

**(१७) * १३६४४५ श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, असल्यास त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू निर्णय कैंव्हापर्यंत होण्याचे अपेक्षित आहे ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) व (३) होय, राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

-----------------

## तळोजा (ता.जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील दूषित पाण्यामुळे मौ.कोपर येथील मासे मृत्यू पावल्याबाबत

**(१८) * १४१८८० श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील प्रक्रिया न करता दुषित सांडपाणी मौ.कोपर (ता.जि.रायगड) येथील मत्स्यशेतीत पसरल्याने माशांचा मृत्यू होऊन शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर पाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरल्याने तेथील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार मत्स्यशेती करणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे तसेच दोषी कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) दिनांक १४/५/२०१९ रोजी" दैनिक लोकमत" या वृत्तपत्रात प्रदूषित पाणी मत्स्यशेतीत शिरल्याने शेकडो माशांचा मृत्यू झाल्याची अशी बातमी प्रसिध्द झाली होती. त्याअनुषंगाने क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिनांक १८/०५/२०१९ रोजी मत्स्यशेतीची पाहणी केली असता मृत मासे आढळून आले नाहीत.

(२) याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आरोग्य अधिकारी पनवेल महानगरपालिका यांच्याकडून अहवाल मागविला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ११ वी च्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा इनहाऊस कोटा कमी केल्याबाबत

**(१९) * १३६१५३ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे**

**ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने ११ वी च्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत खुल्या प्रवर्गातील विदयार्थ्यांच्या प्रवेशासाठी इनहाऊस कोटा १० टक्के कमी केला असल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे २० हजार जागा कमी होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिशुवर्ग ते १० वी पर्यंत एकाच शाळेत शिकलेल्या विदयार्थ्यांना त्याच संस्थेच्या महाविदयालयात प्रवेश मिळणे दुरापास्त झाले असून संस्थाचालक, मुख्याध्यापक आणि पालकांकडून या निर्णयाला विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार या निर्णयाला होणारा विरोध लक्षात घेता या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सन २०१९-२० पासून शासनाने यापुर्वीच्या आरक्षणासोबतच आर्थिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरिता (SEBC) १६% आणि आर्थिक दुर्बल घटकांकरिता (EWS) १०% जागा राखून ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे. यामुळे इनहाऊस कोटा कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

-----------------

## जव्हार व मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील पाणी टंचाईबाबत

**(२०) * १३५११४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा),**

**श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमित घोडा (पालघर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील जव्हार तालुक्यातील मा.मुख्यमंत्री यांनी पाथर्डी या ग्रुप ग्रामपंचायतीअंतर्गत असलेल्या पाथर्डी आणि रामकुंड ही दत्तक घेतलेली तसेच इतर गावे व मोखाडा तालुका शासनाने दुष्काळग्रस्त जाहीर केला असून यातील टंचाईग्रस्त गावांना त्वरीत पाणीपुरवठा करण्याचे आदेश शासनाने दिले असताना तसेच गावपाडयांना आजही एक दिवसाआड टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असल्याने तेथील आदिवासींना उन्हामध्ये पाण्यासाठी भटकावे लागत असल्याचे दिनांक १२ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोखाडा तालुक्यातील कारेगांव, शिवली, उधळे, वाकडपाडा, मारुतीचीवाडी, बोरीचीवाडी, काष्टी, सूर्यमाळ, नाशेरा, खोडाळा व गोंदे साखरी या ११ ठिकाणी असलेल्या नळपाणीपूरवठा योजना बंद स्थितीत असून तालुक्यात माहे मार्च, २०१९ च्या पहिल्याच आठवडयात पाणी टंचाई असलेल्या गाव पाडयाची संख्या ५० वरुन माहे मे, २०१९ च्या अखेरीस १०० पेक्षा अधिक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे आणि विक्रमगड तालुक्यातील टेटवाठी, उघाणीपाडा, हातणे, उटावली, उपराळे इत्यादी गावांमध्ये सन २०११-१२ मध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेतंर्गत नळ पाणी

पुरवठा योजनेतील पाण्याच्या टाक्यांची कामे, पाईप लाईनची अपूर्ण कामे तसेच पाण्याच्या टंचाईबाबत 'समर्थन' संस्थेने दिनांक २० डिसेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा. मंत्री, पाणी पुरवठा, राज्यमंत्री, पाणी पुरवठा, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी पाणी टंचाईग्रस्त गावांना नियमित पाणी पुरवठा करण्याच्या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याने गाव/पाड्यांना पाणीपुरवठा करणे तसेच यात हलगर्जीपणा करणाऱ्या संबधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, पाणी टंचाई तीव्र असताना मोखाडा तालुक्यातील उपरोक्त गावांमधील नळपाणीपूरवठा योजना बंद असण्याची कारणे काय आहेत, सदर नळ पाणीपुरवठा योजना पूर्ववत सुरु करणे, तसेच संबंधित गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) जव्हार तालुक्यातील (जि.पालघर) पाथर्डी या ग्रुप ग्रामपंयायती अंतर्गत असलेली पाथर्डी आणि रामखिंड या दोन गावांमध्ये अंशत: पाणी टंचाई आहे.

मोखाडा व जव्हार तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांना विहित निकषानुसार पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(२) मोखाडा तालुक्यातील ११ योजनांपैकी ८ योजना नियमीत पाणी पुरवठा सुरु असून माहे मार्च अखेर शिवली, उधळे, नाशेरा या तीन योजनांचे स्त्रोत आटल्याने सद्य:स्थितीत नळ पाणी पुरवठा योजनेद्वारे पाणी पुरवठा बंद आहे. तथापि, सदर गाव / वाडयांना टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे.

विक्रमगड तालुक्यातील अपूर्ण योजनांबाबत तसेच पाणी टंचाई बाबत" समर्थन" या संस्थेचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) मोखाडा तालुक्यातील ११ योजनांपैकी स्त्रोत आटल्याने योजना बंद असणा-या शिवली, उधळे, नाशेरा या ३ गाव / वाडयांना टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे.

तसेच विक्रमगड तालुक्यातील टेटवाडी उघाणीपाडा, हातणे, उटावली, उपराळे इत्यादी गावांमध्ये लघु नळ पाणी पुरवठा योजना कार्यरत असून तेथे पाणी टंचाई नाही, यामुळे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) माहे मार्च, २०१९ अखेर मोखाडा तालुक्यातील तीन योजनांचा स्त्रोत आटल्याने सद्य:स्थितीत नळ पाणी पुरवठा योजनेद्वारे पाणी पुरवठा बंद आहे. परंतु, सदर गाव / वाडयांना टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इचलकरंजी (ता.हातकंणकले, जि.कोल्हापूर,) शहरामधील नागरिक स्वस्त रेशनिंगच्या धान्यापासून वंचित असल्याबाबत

**(२१) * १३६३६२ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकंरजी (जि.कोल्हापूर) या वस्त्रोद्योगात अग्रेसर असलेल्या शहरामध्ये सुमारे ३० हजारांहून अधिक कामगार कुटुंबे रेशनिंग धान्यापासून वंचित असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कामगारांना पुरेशा प्रमाणात स्वस्त धान्य दुकानातून धान्य देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) व (२) हे खरे नाही.

इचलकरंजी शहरामधील सुमारे ९०,००० लाभार्थ्यांना प्राधान्य कुटुंब योजनेमध्ये अन्नधान्याचा लाभ देण्यात येत असून, प्राप्त झालेल्या इतर सुमारे १०,००० अर्जांची डाटा एन्ट्री करण्यात आली आहे. सदर लाभार्थी समाविष्ट करण्याकरीता आवश्यक असलेला इष्टांक देण्याची कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणासह राज्यातील ग्रामीण भागातील शासकीय शाळांचा दर्जा सुधारण्याबाबत

**(२२) * १४०१११ श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य व केंद्र शासनाने शिक्षणाबाबत जी धोरणे अवलंबिली आहेत ती पाहता ग्रामीण शिक्षण पध्दत बदं पडण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नविन शैक्षणिक धोरणांमुळे कोकणात ग्रामीण भागातील १ हजार १०० शाळा आणि राज्यात सुमारे ५ हजार शाळा ह्या एकशिक्षकी झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पहिली ते पाचवी या प्राथमिक वर्गांसाठी केवळ एकशिक्षक असल्यामुळे पाच वर्गांना शिकविणे आणि शासनाने लादलेली शाळाबाह्य कामे कधी करावी अशी अनेक प्रश्नचिन्हे या शिक्षकांसमोर आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात शहरी भागात तीन वर्षाच्या मुलापासून केजीचे वर्ग सुरू होत असून या मुलांना नको असलेले शिक्षण देणाचा अट्टाहास पालक करत असून अवाजवी फी घेवून पाळणाघर चालविल्याप्रमाणे वर्ग चालविले जातात आणि दुस-ऱ्या बाजूला ग्रामीण दुर्गम भागामध्ये सुसज्ज शाळा व शिक्षकच उपलब्ध नसल्याने येथील मुलींना उत्तम शिक्षणापासून वंचीत राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोकणासह राज्यातील ग्रामीण भागातील शासकीय शाळा उत्तम दर्जाच्या करुन व पुरेसे शिक्षक पुरविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) अंशत: खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) पवित्र प्रणालीद्वारे राज्यातील शिक्षकांची रिक्त पदे भरणेची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## मुंबई विद्यापीठाचे कल्याण येथील उपकेंद्र सुरु करण्याबाबत

**(२३) * १४०९५२ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाचे गत दहा वर्षापासून प्रतीक्षेत असलेले कल्याण येथील उपकेंद्र अद्यापही सुरु न झाल्याने कल्याण, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ, मुरबाड, शहापूर तालुक्यातील असंख्य विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कल्याण येथे उपकेंद्र सुरु करण्यासंबंधी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई विद्यापीठाला कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून कल्याण उपकेंद्राच्या इमारतीच्या आराखडयाचा दि.२३.०१.२०१४ रोजी बांधकाम मान्यता

दिली असून सद्यस्थितीत कल्याण उपकेंद्राचे पहिल्या टप्प्यातील सुमारे ४८,००० चौ.फूट क्षेत्रफळ बांधकाम पूर्ण झाले आहे. सदर उपकेंद्रास कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने भाग बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दि.१०.०७.२०१८ रोजी दिला आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून चार पदव्युत्तर व पी.एच.डी. कोर्सेस सुरु करण्यात येत आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील एम.एस.डी.पी.च्या विकास कामांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(२४) * १३५८४७ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमांतर्गत पुर्वीचे नांव MSDP या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राज्यातील विविध विकास कामांच्या बांधकामाकरिता जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये विभागास प्राप्त झालेल्या प्रस्तावांची संबंधित जिल्हयाकडून पुर्तता करुन घेण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव अद्याप राज्यस्तरीय समितीसमोर सादर न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू प्रस्ताव राज्यस्तरीय समितीच्या मान्यतेने केंद्रशासनाकडे लवकरात लवकर पाठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम (पूर्वीचे MSDP) अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यस्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीची पुनर्रचना करणे आवश्यक होते. अल्पसंख्याक कल्याण समितीची

पुनर्रचना दि.१३/०६/२०१९ च्या शासन पुरकपत्रान्वये करण्यात आली असून आता संबंधित जिल्ह्यांकडून प्राप्त विकास कामांचे प्रस्ताव राज्यस्तरीय समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात येतील व समितीच्या मान्यतेनंतर केंद्र शासनास सादर करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे व मुंबईतील अन्न परवाना / नोंदणी नसलेल्या झोमॅटो, उबेर, फुडपांडा व स्विगी या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२५) * १३६६१६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व मुंबईत अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या सर्वेक्षणात झोमॅटो, उबेर, फुडपांडा, स्विगी सारख्या नामांकित कंपन्यांनी अन्न सुरक्षा मानके कायद्याचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत एकूण ३६६ आस्थापनांची तपासणी केली असता १२२ आस्थापनांकडे अन्न सुरक्षा मानके कायद्यांतर्गत अन्न परवाना / नोंदणी नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त १२२ आस्थापनांवर व्यवसाय बंद करण्याची कारवाई करण्यात येऊन नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या झोमॅटो, उबेर, फुडपांडा, स्विगी सारख्या नामांकित कंपन्यांना नोटीस देण्यात आल्यानंतर अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नोटीसच्या अनुषंगाने उक्त कंपन्यांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने ऑक्टोबर, २०१८ मध्ये मुंबईत एकूण ३६६ आस्थापनांची तपासणी केली आहे. तसेच १२२ आस्थापनांवर व्यवसाय बंद करण्याची कारवाई करण्यात आलेली आहे.

स्विगी व झोमॅटो या ऑनलाईन अन्न पुरवठा करणाऱ्या आस्थापनांनी विनापरवाना आस्थापनांकडून अन्नाचा पुरवठा केल्याने स्विगी कंपनीविरुध्द ५९ न्यायनिर्णय प्रकरणे व झोमॅटो या कंपनी विरुध्द २६ न्यायनिर्णय प्रकरणे दंडात्मक कारवाईसाठी दाखल करण्यात आली आहेत. तसेच सदर प्रकरणात १९ छोट्या अन्न व्यवसायिकांविरुध्द तडजोड प्रकरणे दाखल करुन रुपये १,५१,५००/- दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच मुंबईतील झोमॅटो मीडीया प्रा.लि. या आस्थापनाविरुध्द विनापरवाना व्यवसाय केल्या प्रकरणी मा.न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यात ०२ विनापरवाना/विना नोंदणी आस्थापनेकडून अन्न पदार्थ खरेदी केल्याप्रकरणी स्विगी व झोमॅटो विरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बांदा नवभारत शिक्षण प्रसारक मंडळ, मुंबई या संस्थेने अतिरिक्त शिक्षक समायोजनात केलेला गैरव्यवहार

**(२६) * १४१७९१ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांदा नवभारत शिक्षण प्रसारक मंडळ, मुंबई या संस्थेने आपल्या ६ शाळांतील ९ शिक्षकांना सन २०१८-२०१९ मध्ये अतिरिक्त दाखवून त्यांचीयादी समायोजनासाठी शिक्षणाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे दिनांक ११ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास पाठविलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ९ शिक्षक हे संस्थेच्या कोणत्याही शाळेत कार्यरत नाहीत तसेच यांची नोंद शालेय दप्तरी वा शालेय प्रणालीत कुठेही नसताना या शिक्षकांची नियुक्ती सन २०१० ते २०१२ या कालावधीत दाखवून बेकायदेशीररित्या शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत दोन महिन्यात मान्यता घेऊन ती २०१५ पूर्वीची पायाभूत पदाची मान्यता दाखविण्यात आली आहे अशा खोट्या शिक्षकांची नियमबाह्य नियुक्ती व मान्यता दाखवून त्यांचे जिल्हास्तरावर समायोजन करण्याचे सुरु असून या प्रकरणात कोट्यवधी

रुपयांचा गैरव्यवहार सुरु आहे, यामुळे याची चौकशी होऊन सबंधितांविरोधात कारवाई करण्याची मागणी करणारे एक निवेदन श्री. अजय श्रीकृष्ण परब, रा. कुडासे, ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग यांनी दिनांक. १४ जानेवारी २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री, शालेय शिक्षण विभाग, सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, आयुक्त (शिक्षण) म.रा.पुणे, शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर, शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जिल्हा परिषद सिंधुदुर्ग आदिकडे पाठविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शैक्षणिक संस्थेने सन २००५ पासून बोगस विद्यार्थी पटसंख्या दाखवून बोगस शिक्षक व कर्मचारी यांची नियुक्ती करून शासनाचा सुमारे ४३ लाख रुपयांच्या निधीचा अपहार केला असल्याने याप्रकरणी चौकशी होऊन चौकशीअंती संस्थेच्या सहा शाळांवर शासनाने प्रशासकाची नियुक्ती केली असून या शैक्षणिक संस्थेत गैरव्यहार होत असल्याने दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजी श्री.अजय श्रीकृष्ण परब, रा.कुडासे यांनी या संस्थेच्या गैरकारभाराविषयी तक्रार करूनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याप्रकरणी श्री.वसंत उर्फ शितल मोहन राऊळ, उपाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, सिंधुदुर्ग जिल्हा तथा पंचायत समिती सदस्य, सावंतवाडी व अन्य ग्रामस्थ यांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०१९ रोजी मा.शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जि.प.सिंधुदुर्ग, मुख्यकार्यकारी अधिकारी. जि.प.सिंधुदुर्ग यांना निवेदन पाठवून दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ रोजी या संस्थेच्या खेमराज मेमोरियल इंग्लिश स्कूल बांदा या शाळेसमोर १ दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा दिला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरहू शैक्षणिक संस्थेचा गैरकारभार तसेच बोगस अतिरिक्त शिक्षक समायोजन प्रस्तावाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) सदर शिक्षण संस्थेच्या ९ अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात आलेले नाही अथवा त्यांना वेतन अदा करण्यात आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरखेड (जि.यवतमाळ) येथील साकळे विद्यालयाच्या शालेय पोषण आहारात झालेला गैरव्यहवहार

**(२७) * १४०१०० श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथील साकळे विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी शालेय पोषण आहारात व अन्य प्रकरणी केलेला अपहार व झालेल्या अनियमितते प्रकरणी चौकशी करण्याबाबत मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांस निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांदूळ, इंधन, भाजीपाला व त्यानुषंगिक कारणासाठी दिलेल्या अनुदानात सुद्धा अपहार झालेला असतांनाही मुख्याध्यापकांनी केलेल्या अपहाराची रक्कम त्यांच्याकडून वसूल न करता शालेय पोषण आहाराच्या प्राप्त निधीतून व शाळेकडून वसूल करण्यात आली असून ही रक्कम अपहार केलेल्या तांदुळाच्या बाजारमुल्याप्रमाणे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालकांच्या सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या अधिनियमानुसार पालकांकडून शुल्क वसूल करणे अनुज्ञेय नसतांना जाहीर नोटीस काढून शैक्षणिक सत्र २०१५-१६ पासून प्रति विद्यार्थी ३५०/- रु ची वसुली करून सदर रक्कम कोठेही जमा न दर्शवता त्या रक्कमेचा अपहार केला असल्याने याबाबत पालकांनी उमरखेड येथील पोलीस चौकीत लेखी तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, आर्थिक वर्ष सन २०१३ पासून अद्यापपर्यंत शाळेचे लेखापरिक्षण केलेले नसून गैरव्यवहार व अपहार लपविण्याकरिता मुख्याध्यापक लेखापरिक्षण करीत नसल्याचे तसेच मुख्याध्यापकांनी केलेला अपहार व अनियमिततेबाबत शासनाकडे वारंवार तक्रारी केल्या असतांना व त्यावर चौकशीकरिता वेळोवेळी निर्देशित केले असतांनाही संबंधित मुख्याध्यापकांवर कारवाई होत नसून त्यांना पाठीशी घालण्याकरिता प्रशासनातील अधिकारी सहकार्य करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर मुख्याध्यापकांनी केलेला

अपहार व अनियमिततेबाबत कारवाई करून रक्कम व्याजासह वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

साकळे विद्यालय, उमरखेड जि.यवतमाळ या शाळेमध्ये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आढळलेल्या अतिरिक्त शिल्लक तांदूळ साठ्यानुसार देय असलेली इंधन-भाजीपाला अनुदान रक्कमेची वसूली शाळेस देय असलेल्या अनुदानातून करण्यात आलेली आहे.

(३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अन्वये प्रवेश दिलेल्या पालकांकडून शुल्क वसूल केल्याप्रकरणी पोलीस स्टेशन, उमरखेड येथे फिर्याद दिली असून सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) व (५) शालेय पोषण आहार योजनेतील अनियमिततेबाबत संबंधित मुख्याध्यापकाची चौकशी करून एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करण्यात आली आहे. तसेच, संबंधित मुख्याध्यापकाविरूध्द महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ नुसार कारवाई करण्याबाबत संबंधित संस्थेस कळविण्यात आले आहे.

-----------------

## अकोला शहरात प्रतिबंधित गुटखा विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२८) * १३८२६७ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरात दिनांक ०३ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास अन्न व औषध प्रशासन व स्थानिक पोलीस विशेष पथकाने संयुक्त कारवाई करून सुमारे ३२ लाख रूपयांचा प्रतिबंधीत व अवैध गुटखा मुद्देमालासह जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी प्रतिबंधीत गुटखा व वाहतुक करणारा ट्रक क्र. के.ए. १६/ सी १७८० हा कर्नाटक राज्यातील परवाना प्राप्त असल्याने प्रतिबंधीत व अवैध गुटखा व्यापार करणारी आंतरराज्यीय टोळी कार्यरत असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विशेष पथकाने काही दिवसांपुर्वीच एम.आय.डी.सी. परिसरात २ लाख रूपये किंमतीचा प्रतिबंधीत व अवैध गुटखा जप्त केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गुटखा माफीया औषध प्रशासन विभागाच्या संगनमतानेच असा अवैध व्यापार करीत असल्याचा संशय व्यक्त होत असल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

दि.०३ मे, २०१९ रोजी अन्न व औषध प्रशासन व पोलिस यांच्या संयुक्त पथकाने अकोला शहरात एकूण १२ लाख रुपयांचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त केला आहे.

(२) प्रतिबंधीत गुटख्याची वाहतुक करणाऱ्या ट्रकचा नोंदणी क्रमांक जरी कर्नाटक राज्यातील असला तरी सकृतदर्शनी प्रतिबंधीत अन्न पदार्थाचा व्यापार करणारी आंतरराज्यीय टोळी कार्यरत असल्याचा कोणताही ठोस पुरावा अन्न व औषध प्रशासनास आढळून आलेला नाही.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या संगनमताने गुटख्याचा अवैध व्यापार करत असल्याचा संशय व्यक्त होत असल्याची कोणतीही तक्रार अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्भ्वत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील लाभार्थी शौचालय बांधकाम अनुदान योजनेपासून वंचित असल्याबाबत

**(२९) * १३९५८३ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शौचालयाच्या बांधकामासाठी रुपये १२ हजार प्रोत्साहन अनुदान शासनाकडून देण्यात येत असून मराठवाड्यामध्ये रुपये ५१२ कोटी ६७ लाख प्रोत्साहनपर अनुदान माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान उपलब्ध करुन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रोत्साहनपर अनुदान उपलब्ध होऊनही प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे मराठवाड्यातील सव्वाचार लाख लाभार्थींना या योजनेपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधितांवर कारवाई करुन वंचित लाभार्थ्यांना लाभ देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत मराठवाडयातील आठ जिल्हयांना सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये एकूण ६४५ कोटी २७ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(२) व (३) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत मराठवाडयातील वैयक्तिक शौचालय बांधकाम केलेल्या एकूण १०,९६,२१९ पात्र लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान वितरीत करण्यात आले आहे. लाभार्थी यादीमध्ये काही नांवे दुबार, मयत, स्थलांतरीत, पूर्वी लाभ मिळालेले असल्यामुळे यादीतील शिल्लक १,९७,९०३ कुटुंबांची जिल्हा परिषद स्तरावरुन पुर्नतपासणी करण्यात येत आहे. तपासणीअंती पात्र लाभार्थ्यांना वैयक्तिक शौचालय बांधकाम प्रोत्साहन अनुदान वितरीत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एमएसबीटीईच्या सिव्हील इंजिनीअर डिप्लोमाच्या द्वितीय वर्षाच्या प्रश्नपत्रिकेत दोन प्रश्नांमध्ये त्रुटी असल्याबाबत

**(३०) * १४०७७५ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने (एमएसबीटीई) घेतलेल्या सिव्हील इंजिनीअर डिप्लोमाच्या द्वितीय वर्षाच्या 'बिल्डींग प्लानिंग ॲण्ड ड्रॉई' या विषयाच्या प्रश्नपत्रिकेत दोन प्रश्न चुकले असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने (एमएसबीटीई) गत वर्षीच डिप्लोमा अभ्यासक्रमामध्ये बदल केला असून बदल झाल्यानंतर राज्यातून २५ हजार विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सिव्हील इंजिनीअर डिप्लोमाच्या द्वितीय वर्षाच्या प्रश्नपत्रिकेत चुकलेल्या प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने (एमएसबीटीई) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून अभ्यासक्रमात बदल केला आहे. सदर विषयाच्या परीक्षेसाठी एकूण १४,५९१ एवढया विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरले व त्यापैकी १३,५०३ इतक्या विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

(३) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने दिनांक १३ मे, २०१९ रोजी घेतलेल्या सिव्हील इंजिनिअरींग डिप्लोमाच्या द्वितीय वर्षाच्या "बिल्डींग प्लॅनिंग ॲण्ड ड्रॉईग" या विषयाच्या प्रश्नपत्रिकेत प्रश्न क्र.०३ आणि प्रश्न क्र.०६ मधील उपप्रश्न क्र.०१ मध्ये अशा एकूण दोन प्रश्नांमध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत. त्यास अनुसरून मंडळाकडून सदर त्रुटींचे अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

यासंदर्भात मंडळाकडून दिनांक १५/५/२०१९ रोजीचे आदेशांन्वये त्रिसदस्यीय तज्ञ समिती गठीत करण्यात आली असून, सदर समितीची दिनांक ६/६/२०१९ रोजी बैठक झाली. सदर बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

१. प्रश्न क्र. ३ करिता "बिल्डींग प्लॅनिंग ॲण्ड ड्राईंग" या विषयाचे एकूण ७० मार्काऐवजी ५८ ( ७०-१२) मार्क धरण्यात यावेत व विद्यार्थ्याला सदर विषयात एकूण मिळालेले मार्क ७० मार्कात रुपांतरीत करण्यात यावेत.

२. प्रश्न क्र.६ मध्ये पर्याय उपलब्ध असला तरी विद्यार्थ्यांना + ६ अतिरिक्त गुण देण्यात यावेत.

३. उपरोक्तप्रमाणे समितीने दिलेल्या निर्णयानुसार संबंधित विषयाबाबत कार्यवाही करुन त्याप्रमाणे विद्यार्थ्यांचा निकाल जाहिर करण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यात येत असल्याने, संबंधित विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुण्यातील मुळा-मुठा नदी प्रदुषणमुक्त करण्याबाबत

**(३१) * १४०९१४ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २९ राज्य व सहा केंद्रशासित प्रदेशातील नद्यासंदर्भात केलेल्या सर्वेक्षणात राज्यातील नद्यांचे भवितव्य धोक्यात असल्याचे दिनांक ०५ मार्च, २०१७ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हातील मुळा मुठा नदी स्वच्छतेसाठी साडेनऊशे कोटी रुपयांचा प्रस्ताव केंद्र शासनाने मंजूर केला असून एकवीस कोटी रुपये राज्य शासनाने मंजूर केले आहेत. पुढील तीन वर्षात नऊशे कोटी रुपये खर्च करून मुळा मुठा नदीचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन मा. मंत्री यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणतीही ठोस उपाययोजना शासनाकडून अद्याप राबविण्यात आलेली नसल्याने मुळा मुठा नदीतील प्रदूषण कमी न होता नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर जलपर्णी वाढल्याने या नदीच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या ग्रामीण भागातील नागरीक आणि शेतकऱ्यांना दुषित पाणी प्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुळा मुठा नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी व मा. मंत्री यांनी दिलेलं आश्वासन पूर्ण करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २००९ ते २०१२ या कालावधीतील नद्यांच्या जल गुणवत्ता निकषावर आधारित प्रदूषित नद्यांचे पट्टे जाहीर केले होते. त्यामध्ये राज्यातील ४९ प्रदूषित पट्टयांचा समावेश होता. तसेच केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २०१८ मध्ये प्रसिध्द केलेल्या सुधारित अहवालानूसार राज्यातील नद्यांमध्ये ५३ प्रदूषित पट्टे असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

• पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामधून विनाप्रक्रिया सोडण्यात येणाऱ्या घरगुती सांडपाण्यामुळे प्रदूषित झालेल्या मुळा-मुठा व भिमा नदी काठावरील गावांमध्ये शुध्द पिण्याचे पाणी मिळण्याकरिता जलशुध्दीकरण संयंत्रणा बसविण्यासाठी पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी अनुक्रमे रु. ६.८८५ कोटी व रु. ६.९५ कोटी इतकी रक्कम जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे वर्ग केली आहे.

• सदर रकमेतून दौंड, हवेली, इंदापूर, शिरुर व खेड या तालुक्यामध्ये जलशुध्दीकरण सयंत्रणा बसविण्याची एकूण १३३ कामे मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी, १२७ कामे पूर्ण करण्यात आलेली असून त्यांचा पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. ४ कामे जागा उपलब्ध न झाल्याने रद्द करण्यात आलेली आहेत व २ कामे प्रगतीपथावर आहेत.

• सदर कामांकरिता प्राप्त एकूण रु. १३.८३५ कोटी इतक्या निधीपैकी रु. १२.१०३ कोटी इतका निधी खर्च झाला असून रु. १.७३२ कोटी इतका निधी जिल्हा परिषद, पुणे यांचेकडे शिल्लक आहे.

• पुणे महानगरपालिका आरोग्य कार्यालय किटक प्रतिबंधक विभागामार्फत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील नदी व तलाव पात्रामधील जलपर्णी निर्मुलनाचे काम सातत्याने करण्यात येत असून याकरिता किटक प्रतिबंधक विभागाकडील सुमारे १०० सेवक व १० बोटी कार्यरत आहेत.

(४) होय, हे खरे आहे.

(५) मुळा-मुठा नदी संवर्धन प्रकल्पातील प्रस्तावित ११ एस.टी.पी. (एकूण क्षमता ३९६ दश लक्ष लिटर) पैकी ०६ एस.टी.पी. (एकूण क्षमता २७७ दश लक्ष लिटर) च्या निविदा पुणे महानगरपालिकेने मागविल्या असून, निविदांची तांत्रिक छाननी सुरु आहे. तसेच ११३ कि.मी. मलवाहिन्या टाकणेपैकी ४३ कि.मी. मलवाहिन्या टाकणेचे काम सुरु असून ३३ किमी लाईन टाकणेसाठी निविदा मागविल्या आहेत. तसेच ३७ किमी लाईन टाकणेसाठी ठेकेदार पूर्वपात्रता निश्चितीसाठी पुणे महानगरपालिकेकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

• पुणे महानगरपालिका ३४४.० लक्ष घनमिटर घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया व काही अंशी प्रक्रिया करुन नदीमध्ये सोडत असल्याचे वेळोवेळी निदर्शनास आल्याने पुणे महानगरपालिकेने रु.३४.७ लक्ष प्रति दिन (१ पैसा/लिटर) इतका उपाय योजना / प्रदूषण नियंत्रण खर्चाखाली वेगळे खाते चालवावे असे निर्देश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १४.०२.२०१९ रोजी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना दिले आहेत.

• तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९७४ मधील कलम ४१ अन्वये पुणे महानगरपालिका, पुणे यांची रु.१५ करोड इतकी रक्कम गोठविण्याबाबतचे आदेश संबंधित बँकेस दिनांक २५/०४/२०१९ रोजी दिले होते. त्यानूसार संबंधित बँकेने सदरहू रक्कम गोठविण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देसाईगंज (वडसा) (जि.गडचिरोली) येथील तिरुपती राईस मिल व तिरुपती राईस इंडस्ट्रीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३२) * १४११५२ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळाने यावर्षी शेतकऱ्यांकडून खरेदी केलेले धान भरडाईबाबत शिवणी येथील लक्ष्मी राईस मिलसोबत करार केला होता यानुसार सदर राईस मिलला भरडाई केलेल्या तांदळाचा चामोर्शी डेपोला पुरवठा करणे बंधनकारक असतांना तो माल पुरवठा करणे शक्य नसल्याने लक्ष्मी राईस मिलचे लेबल असणाऱ्या पोंत्यामध्ये प्रत्यक्षात देसाईगंज येथील तिरूपती राईस मिलमधून तांदूळ भरला जात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर फर्मने आदेशाचे पालन न करता दुसऱ्या राईस मिलच्या नावावर धान भरडाई करून पुरवठा केला असल्याने देसाईगंजचे तहसीलदार यांनी पोलीसांच्या मदतीने देसाईगंज येथील तिरूपती राईस मिलमध्ये दिंनाक ९ मे, २०१९ रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास धाड टाकून दोन ट्रकमधील ६८८ तांदळाची पोती जप्त केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देसाईगंज (वडसा) (जि.गडचिरोली) येथील तिरुपती राईस मिल व तिरुपती राईस इंडस्ट्री या एकाच परिसरात असलेल्या दोन फर्मला खरीप हंगाम सन २०१७-१८ मध्ये दिलेल्या धान भरडाईमध्ये अनियमितता आढळून आल्याने या फर्मला खरीप हंगाम २०१८ -१९ करिता धान भरडाईस देण्यात येऊ नये असे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चार वर्षापूर्वी सावरगाव (ता.धानोरा, जि.गडचिरोली) येथील आदिवासी महामंडळाच्या दोन हजार क्विंटलपेक्षा जास्त धानाच्या चोरी संदर्भात देखील तिरूपती राईस मिलवर गुन्हा दाखल झाला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर राईस मिलमध्ये काम करणारा विनोद मेश्राम, वय ४५ राहणार हरदोली, ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर या कामगाराचा दिंनाक १० मे, २०१९ रोजी संशयास्पद मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, काळ्या यादीत असलेल्या या फर्मला धान भरडाई देण्यासाठी आदिवासी विकास महामंडळ व मंत्रालयीन अधिकारी तसेच इतर राईस मिलचे मालक हे सहाय्य करीत असल्याने गडचिरोली जिल्हयात गैरप्रकार सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) नाही, हे खरे नाही.

(५) सदर बाबतीत पोलीस निरीक्षक, वडसा यांचेकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे.

(६) हे खरे नाही.

(७) उक्त अनु.१ व २ प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी चौकशी समिती नेमणूक केलेली होती. सदर चौकशी समितीने त्यांचा अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर झालेला असून अहवालाच्या अनुषंगाने गडचिरोली जिल्हा भात भरडाई समन्वय समितीचे बैठक जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दि.२०/०६/२०१९ रोजी पार पाडण्यात आली. त्यानुषंगाने मे.तिरुपती राईस मिल, वडसा व मे.लक्ष्मी राईस मिल, शिवणी यांचे हंगाम २०१८-१९ करीता भात भरडाई करारनामा रद्द करण्यात आलेला आहे.

(८) विलंबनाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घोटी (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक उर्दू शाळेत शालेय गणवेश खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(३३) * १३९२६० श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोटी (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक उर्दू शाळेत मुख्याध्यापक व शिक्षकांनी गणवेश निधीत मोठ्या प्रमाणात अपहार केल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्याध्यापिका व शिक्षकांनी सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षात पटसंख्येपेक्षा अधिक विद्यार्थी संख्या दाखवून जादा विद्यार्थ्यांचे गणवेश अनुदान विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा न करता आपल्या खात्यावर वर्ग करुन अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषी मुख्याध्यापक व शिक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) समग्र शिक्षा अभियानांर्गत सन २०१७-१८ अंतर्गत घोटी ता. इगतपूरी, जि. नाशिक येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमधील ५५ विद्यार्थ्यांच्या योजनेचे अनुदान त्यांच्या बँक खात्यावर वर्ग न करता शिक्षकांच्या खात्यावर जमा करण्यात आले होते. तथापि, सदर अनुदानातून ५५ विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

(३) सदर प्रकरणी योजनेच्या अनुदान वितरणामध्ये आर्थिक अनियमितता झाल्यामुळे दोषींविरूध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यात इंग्रजी शिक्षणाच्या नावाखाली अनेक संस्थांकडून पालकांची आर्थिक फसवणूक होत असल्याबाबत

**(३४) * १३५४७९ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यात इंग्रजी शिक्षणाच्या नावाखाली अनेक संस्था पालकांची आर्थिक फसवणुक करत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण संस्था पालकांकडून शिक्षण शुल्क, परिवहन व्यवस्था व इतर बाबींच्या संदर्भात डोनेशनच्या नावाखाली २० ते २५ हजार रुपये शुल्क आकारत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार डोनेशन बंदी असतानाही सदर जिल्हयामध्ये डोनेशनच्या नावाखाली होत असलेली आर्थिक फसवणूक थांबविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिरा रोड, घोडबंदर-रेतीबंदर (जि.ठाणे) येथील कापडिया कंपाऊंडमधील गोदामातून बेकायदा धान्यसाठा जप्त केल्याबाबत

**(३५) * १३५७२३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा रोड, घोडबंदर-रेतीबंदर (जि.ठाणे) मध्ये कापडिया कंपाऊंडमधील एका गोदामात दिनांक ३० डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास टाकलेल्या धाडीमध्ये सुमारे अडीच कोटीं रुपयांचा बेकायदा धान्यसाठा जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या पुरवठेदारावर व आहार वितरण करणाऱ्या संस्थांविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला असून सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिक्षा परिषदेच्या शिष्यवृत्ती परिक्षेत मराठी व इंग्रजी प्रश्नपत्रिकांमध्ये चुका झाल्याबाबत

**(३६) * १३८९८६ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक २४ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आलेल्या राज्य परिक्षा परिषदेच्या शिष्यवृत्ती परिक्षेत ५ वी ते ८ वी च्या इंग्रजी व मराठी प्रश्नपत्रिकांमध्ये अनेक चुका झाल्या असल्याचे दिनांक १२ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांचे इंग्रजी भाषांतर चूकीचे झाले असून विदयार्थ्यांना प्रश्नच नीट कळला नसल्याने उत्तर ही लिहीता आलेले नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१), (२) व (३) अंशतः खरे आहे.

दिनांक २४ फेब्रुवारी, २०१९ रोजी आयोजित करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परिक्षांसंबंधी कोणत्याही प्रश्नांवर काही आक्षेप असल्यास मत नोंदविण्याकरीता शाळांना व पालकांना दि. ६ मार्च ते १५ मार्च, २०१९ या कालावधीत ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. ऑनलाईन प्राप्त प्रत्येक आक्षेपावर विषय तज्ञांचे अभिप्राय घेवून त्यानुसार काही चुकीचे प्रश्न रद्द करण्यात आले आहेत, तर काही प्रश्नाच्या उत्तराच्या पर्यायात आवश्यक ते बदल करुन अंतिम उत्तरसूची तयार करण्यात आली आहे. कोणत्याही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याबाबत सर्वतोपरी विचार करण्यात आला आहे.

आगामी शिष्यवृत्ती परीक्षेच्या प्रश्नपत्रिका निर्मीती व त्यासंबंधी इतर सर्व प्रक्रियेमध्ये संबंधित तज्ञ प्राश्निक, भाषांतरकार यांना यापुढे सहभागी करुन न घेण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मानखुर्द (मुंबई) येथील एस.एम.एस.एक्सक्लुजीव्ह कंपनी स्थलांतरीत करण्याबाबत

**(३७) * १३९३०८ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई स्थित असलेल्या एम-पूर्व विभागात एस. एम. एस. एक्सक्लुजीव्ह नामक रासायनिक कंपनीमुळे मानखुर्द-शिवाजीनगर प्रदूषणात वाढ होत असल्याची बाब दिनांक १३ मे, २०१९ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनी बंद करण्यात यावी यासाठी वारंवार तक्रारी केल्या असताना सदर कंपनी लवकरात लवकर स्थलांतरित करण्यात येणार असल्याचे मा. पर्यावरण मंत्री यांनी आश्वासित करूनही अद्यापपर्यंत कंपनी बंद करणे तसेच कंपनीच्या स्थलांतरणाबाबत कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनी बंद करण्याबाबत वेळोवेळी स्थानिक नागरिक, सेवाभावी संस्था, लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत धरणे आंदोलन करण्यात आले असून संबंधित विभागांना सुद्धा कंपनी बंद करण्याबाबत निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, येथील प्रदूषणामुळे लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून सदर विभागातील सामान्य नागरिकांचे आयुष्यमान हे ३९ वर्ष असल्याचे एका अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर कंपनी स्थलांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशतः खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) आरोग्य विभागाकडून सदरील बाब तपासून घेण्यात येत आहे.

(५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदरील संस्थेस त्यांचे भस्मिकरण केंद्र केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार योग्य जागी स्थलांतरित करण्याबाबत दि. २४/८/२०१८ रोजी निर्देश दिलेले आहेत. सदरील संस्थेने सामुहीक जैव वैदयकीय कचरा विल्हेवाट केंद्रास ७५ कि.मी. च्या आतील परीसरात उपयुक्त अशी जागा घेण्याचे काम अंतीम टप्प्यात असल्याचे कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदगाव व चांदवड (जि.नाशिक) तालुक्यांतील गावांसाठी सुरु करण्यात आलेल्या ४२ खेडी योजनेच्या निकृष्ट कामाबाबत

**(३८) * १४०१०५ डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नांदगाव व चांदवड तालुक्यांतील गावांसाठी सुरु करण्यात आलेल्या ४२ खेडी योजनेच्या निकृष्ट दर्जाच्या झालेल्या कामाबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिका-यांना प्रत्यक्ष भेट देऊन पहाणी करून कार्यवाही करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्र्यांनी माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून देखभालीसाठी वार्षिक दीड कोटी रुपये खर्च होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) व (३) योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाले नाही.

योजनेच्या उद्भवाचे अंतर दूर, वाडया वस्त्यांची संख्या जास्त व मोठया प्रमाणावर पंपिग यामुळे देखभाल व दुरुस्तीचा खर्च जास्त आहे. त्यामुळे संयुक्त शिखर समितीस दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी रु. १५६.५४ लक्ष (वार्षिक) एवढा खर्च येतो.

मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांनी दिनांक १४/०५/२०१९ रोजी योजनेची प्रत्यक्ष पाहणी करुन आवश्यक ती दुरुस्तीची कामे करुन घेण्याबाबत व पाणीपट्टीत वाढ करुन वसूली करण्याबाबत संयुक्त शिखर समितीस मार्गदर्शन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे परिक्षा विभागाचे काम रोजंदारी कर्मचाऱ्यांकडून करुन घेण्यात येत असल्याबाबत

**(३९) * १३४८९५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे परिक्षा विभागातील २१७ मंजूर पदांपैकी ८० पदे कार्यरत असून यातीलही काही कर्मचारी निवृत्त झाले असल्याने वर्षभरासाठी रोजंदारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन त्यांच्याकडून परिक्षा विभागासारख्या महत्वाच्या विभागाची कामे करुन घेण्यात येत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सुमारे २८१ हून अधिक महाविद्यालये असून २ लाख ९० हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून विद्यापीठ परिक्षा विभागास विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रियेपासून ते पदवी प्रमाणपत्र वाटपापर्यंत अनेक कामे करावी लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार परिक्षांवर होणारा परिणाम लक्षात घेता उक्त पदे भरण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) व (३) हे अशंत: खरे आहे.

प्रश्नात नमूद विद्यापीठासाठी एकूण ७०४ शिक्षकेतर पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४८७ पदे भरलेली असून २१७ पदे रिक्त आहेत. शासनमान्य मंजूर पदांपैकी ९३ अधिकारी/कर्मचारी विद्यापीठाच्या परीक्षा विभागात कार्यरत आहेत. याव्यतिरिक्त विद्यापीठाने आवश्यकतेनुसार परीक्षा विभागामध्ये

रोजंदारी तत्वावर पात्र कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. तथापि, परीक्षा विभागातील महत्वाचे व गोपनीय कामकाज कायमस्वरूपी असलेल्या कर्मचाऱ्याकडून केली जातात. तसेच परीक्षा विषयक कामकाजावर विपरित परिणाम होणार नाही, याबाबत विद्यापीठाकडून दक्षता घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठातील प्राध्यापकांनी केलेल्या उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाबाबत

**(४०) * १३६४६० श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील २९ प्राध्यापकांनी विविध अभ्यासक्रमाच्या प्रत्येकी पाच हजारांहून अधिक तर एका प्राध्यापकाने १४ हजार ७५४ उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई विद्यापीठामार्फत घेण्यात येणा-या विविध अभ्यासक्रमाच्या परिक्षांच्या गुणांबाबत तक्रारी व पुनर्मुल्यांकनासाठी माहे जानेवारी ते एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान किती विद्यार्थ्यांचे अर्ज पुनर्मुल्यांकन विभागाला प्राप्त झाले आहेत,

(३) असल्यास, विद्यापीठाच्या विधि पदव्युत्तर (एलएलएम) च्या पहिल्या सत्रासाठी माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आलेल्या परिक्षेचा निकाल दिनांक २६ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास प्राप्त झाल्यानंतर कु.अमोल गवळी या विद्यार्थ्याने गुण पुनर्मुल्यांकनाबाबत अर्ज केल्याबरोबर त्याच दिवशी त्याला मिळालेल्या १० गुणांऐवजी ४८ गुण मिळाल्याचा निकाल देण्यात आला असल्याने या पुनर्मुल्यांकन निकालाबाबत ॲ.संदिप केदारे, विद्यार्थी प्रतिनिधी यांनी माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान विद्यापीठांच्या कुलगुरुंना व विद्यापीठ व्यवस्थापनाला निवेदन देऊन हा निर्णय संशयास्पद असल्यामुळे याप्रकरणी चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय व ही चौकशी पुर्ण होण्यास किती कालावधी लागेल,
(५) असल्यास, शासनाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये, याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) एप्रिल, २०१९ चे मुल्यांकन सुरु असल्याने एप्रिल, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात मुंबई विद्यापीठातील प्राध्यापकांनी किती उत्तर पुस्तिकांचे मुल्यांकन केले आहे याची अंतिम आकडेवारी निश्चित झालेली नाही.
(२) मुंबई विद्यापीठामार्फत घेण्यात येणा-या विविध अभ्यासक्रमाच्या परिक्षांच्या गुणांबाबत उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी ७४,००० एवढे अर्ज प्राप्त झालेले आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) ॲड.संदिप केदारे, विद्यार्थी प्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावरुन वस्तुस्थिती पडताळून पहाण्यात आली असून कु.अमोल गवळी या विद्यार्थ्याच्या गुण पुनर्मुल्यांकनाबाबतची सर्व प्रक्रिया नियमानुसार करण्यात आलेली आहे.
(५) विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या विविध प्रकारच्या तक्रारींची दखल घेऊन सदर तक्रारींचे निवारण करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच कोणत्याही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याची पुरेपुर काळजी विद्यापीठ प्रशासनाकडून घेण्यात आलेली आहे.

-----------------

## राज्यातील गावांमधील इंग्रजी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळांना जमिनविषयीची घातलेली अट शिथिल करण्याबाबत

**(४१) * १३५३१० श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे**

**(घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लहान वस्ती असलेल्या गावांमध्ये इंग्रजी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळांना जमिनविषयीची अट घातली असल्याने उक्त गावांमध्ये सुरु असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व अटींचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या अटी शिथील करण्याबाबत महाराष्ट्र अनएॅडेड स्कूल असोसिएशन व दिवा अनएॅडेड स्कूल असोसिएशन यांनी शासनाकडे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) हे खरे नाही. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०१३ नुसार, ग्रामीण भागातील नवीन शाळांसाठी किमान एक एकर जागेचा निकष व अन्य निकषांची पुर्तता होत असलेल्या शाळांना परवानगी देता येते. त्यानुसार परवानगी दिलेल्या शाळा जमिनीची अट या कारणास्तव बंद पडत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) याबाबतचे सदर दिनांकाचे निवेदन प्राप्त नाही.

(४) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०१८ नुसार, नवीन शाळेसाठी सर्व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये आणि राज्यातील सर्व "अ" वर्गाच्या नगरपालिकांच्या क्षेत्रांमध्ये किमान ५०० चौ.मी. जागा व उर्वरित सर्व क्षेत्रांमध्ये किमान एक एकर जागा याप्रमाणे निकष सुधारित केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मन्याड नदीचा (जि.नांदेड) नदी शुद्धीकरण योजनेत समावेश करण्याबाबत

**(४२) * १३९६१३ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नदी शुद्धीकरण योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असून तदनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील कंधार, नायगांव, मुखेड, बिलोली या तालुक्यांची कामधेनू असलेल्या मन्याड नदीचा समावेश नदी शुद्धीकरण योजनेत करण्यात यावा अशी मागणी स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधींनी मा.पर्यावरण मंत्री व सचिव, पर्यावरण विभाग यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच त्यानुषंगाने सुरु केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) प्रश्नाधिन विषयाबाबतचे निवेदन पर्यावरण विभागास प्राप्त झालेले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: पुणे येथील कॉलेज ऑफ इंजिनिअर या कॉलेजमध्ये ५४ प्राध्यापकांची नियमबाह्यरित्या नियुक्ती केल्याबाबत

**(४३) * १४१६१० प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील कॉलेज ऑफ इंजिनीअर (सीओईपी) या कॉलेजच्या ५४ प्राध्यापकांची नियुक्ती नियमबाह्य पद्धतीने असल्याच्या निर्णयावर मा.उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संचालकांनी महाविद्यालयातील २००७ ते २०११ या कालावधीत प्राध्यापकांच्या नियमबाहय पद्धतीने झालेल्या नियुक्त्या रद्द करण्याचे आदेश दिले असल्याने त्या निर्णयाला प्राध्यापकांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात प्रत्येक अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये असे प्रकार होत असल्याने तसेच उक्त महाविद्यालयामध्ये नेमणूकांमधे अनियमितता व गैरव्यवहार करणाऱ्यांवर कारवाई होत नसल्याबाबत आमरण उपोषण करण्याचा इशारा अभियांत्रिकी महाविद्यालय राजपत्रित अध्यापक/ अधिकारी संघाने शासनाला दिला असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या संस्थेमध्ये राबविण्यात आलेली अध्यापकांच्या नियुक्तीची संपूर्ण निवड प्रक्रिया मा.उच्च न्यायालयाने अवैध ठरविलेली असून संस्थेमार्फत केलेल्या ५४ अध्यापकांच्या नियुक्त्या नियमबाहय असल्याचा निर्णय मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक २८.०२.२०१९ रोजी दिला आहे.

(२) होय.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथील सन २००७ ते २०११ या कालावधीत ५४ अध्यापकांच्या नियमबाह्य पध्दतीने झालेल्या नियुक्त्या रद्द करण्याबाबत शासनाच्या दिनांक २३.०१.२०१५ रोजीच्या आदेशाविरुद्ध संचालक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्रमांक ३९१९/२०१५ द्वारे आव्हान दिले होते. तसेच, या संस्थेतील ३७ अध्यापकांनीसुद्धा शासनाच्या आदेशाविरुद्ध मा.उच्च न्यायालयात रिट याचिका स्टँप क्रमांक ३४७८५/२०१८ दाखल केली होती.

मा.उच्च न्यायालयाने अध्यापकांच्या विरोधात निर्णय दिल्याने या संस्थेमधील अध्यापकांनी मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल केलेली असून सद्यःस्थितीत प्रस्तुत प्रकरण न्यायाप्रविष्ठ आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांना अनुदान देण्याबाबत

**(४४) * १३४९५१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००१ मध्ये शासनाने कायम विनाअनुदानित तत्वावरच शाळांना मान्यता देण्याचे धोरण अंमलात आणले असून सन २००९ साठी कायम विनाअनुदानित मंजूर केलेल्या १,६२८ शाळांना पुढील अनुदानाचा टप्पा देण्याचा निर्णय दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अनेक धरणे, आंदोलने, उपोषणे करून देखील १६२८ शाळा व २४२५ वर्ग तुकड्यांना २० टक्केच अनुदान देण्यात आले असल्याने २१ हजार शिक्षक गत १९ वर्षापासून विना वेतन काम करित असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, माहे जुलै, २०१६ वा त्यादरम्यान मान्यता दिलेल्या ७८९ शाळांना व ६९० तुकड्यांना अनुदान देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने शासन प्रचलित नियमानुसार राज्यातील शाळांना २० टक्के अनुदाना ऐवजी १०० टक्के अनुदान देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी दिलेल्या व “कायम” शब्द वगळलेल्या शाळांपैकी १६२८ शाळांना शासन निर्णय, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये दिनांक १ सप्टेंबर, २०१६ पासून सरसकट २० टक्के अनुदान मंजूर केले आहे. त्यांना पुढील अनुदान मंजूरीची बाब विचाराधीन आहे.
(३) व (४) जुलै २०१६ वा त्या दरम्यान ७८९ शाळा व ६९० तुकडयांना मान्यता दिलेली नसल्याने याबाबत चौकशी करण्याचा प्रश्न येत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.